"महाराष्ट्रतील अभियांत्रिकी महाविद्यालय ग्रंथालयातील नियतकालिकाच्या व्यवस्थापनाचा चिकीत्सक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आंतरविद्या शाखेअंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील पीएडी. डी. पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

अडसुळे पल्लवी पांडुरंग

मार्गदर्शक

डॉ. ढाकणे बालाजी निवृत्ती

(M.Lib.&I.Sc,Ph.D)

प्राचार्य

कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय, गंगाखेड
ता. गंगाखेड जि. परभणी

संशोधन केंद्र

मध्यमशास्त्र संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जुलै २०२२

अनुक्रमणिका

(Index)

अ.क्र	तपशिल	पृष्ठ क्र.

१	प्रस्तावना	1 ते 3
२	संशोधन विषयाच्या कार्यात्मक व्याख्या	3 ते 4
३	संशोधनाची उद्दिष्टे	4
४	संशोधनाची गृहितकृत्य	4
५	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	5
६	संदर्भ साहित्याचा आढावा	5
७	संशोधन विषयाची उपयुक्तता/निवड	5
८	संशोधन पद्धती	6
९	माहिती साधने	6
१०	संशोधनाची रूपरेषा	6
११	वर्षावार कामाची आखणी	7
१3	प्रकरणाचा आढावा	8
१२	संदर्भसुची	8 ते 9

"महाराष्ट्रतील अभियांत्रिकी महाविद्यालय ग्रंथालयातील नियतकालिकाच्या व्यवस्थापनाचा चिकीत्सक अभ्यास"

१. प्रस्तावना :

ग्रंथालय हा शिक्षण संस्था आत्मा आहे. कोठल्याही शिक्षणसंस्थेची प्रगती ही त्या संस्थेचे ग्रंथालय किती समृद्ध आहे. बाबी अवलंबून असते. त्यामुळे आधुनिक ग्रंथालय व्यवस्थापन करत

असताना ग्रंथालयात असलेल्या सेवांना अधिक महत्व देणे आवश्यक आहे. ग्रंथालचे कामकाज अधिक व्यवथितपणे चालवण्यासाठी नियोजनबद्ध व्यवस्थापनाची अतिशय आवश्यकता आहे. व्यवस्थापन हा संस्थेचा आत्मा असल्यामुळे सुयोग्य व्यवस्थापन हा संस्थेचा प्रगतीमधील एक महत्वाचा घटक आहे. व्यवस्थापन जर योग्य प्रकारचे नसेल तर संस्था प्रगती करू शकत नाही. ग्रंथालय हे कुठल्याही प्रकारचे असो सार्वजनिक असो वा शैक्षिणक असो ग्रंथालयात योग्य मनुष्यबळ ग्रंथालयाचे व्यवस्थापन करणे अतिशय गरजेचे आहे.

आजच्या डिजिटल ग्रंथालयाच्या युगात व्यवस्थापनाला अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. ग्रंथालय ही सेवाभावी संस्था आहे. 'ना नफा ना तोटा' ह्या सरकारच्या तत्वानुसार सतत सेवा देत असतात. ग्रंथालयीन सेवांच्या काही भागाचे स्वरूप हे जरी यंत्रवत असले तरी ग्रंथालयातील बऱ्याच सेवा ह्या त्या ग्रंथालयातील मनुष्यबळावर अवलंबून आहेत. यामुळे ग्रंथालयीन व्यवस्थापन ह्या घटकास प्राधान्य दिलेले आहे. ग्रंथालयाचे व्यवस्थापन करीत असताना व्यवस्थापन हा महत्वाचा भाग आहे.

ग्रंथालय ही एक सेवाभावी संस्था आहे. याव्दारे विविध सेवा प्रदान केल्या जातात. ग्रंथालयाचे व्यवस्थापन, कार्यपद्धती, वाचन साहित्य, वाचन व ग्रंथालय सेवा या सर्व घटकामध्ये समन्वय साधणे म्हत्वाचा भाग आहे.

वाचकांना अद्यावत माहिती नियतकालिकाच्या माध्यमातून पुरवली जाते. नियतकालिकाचे वेळेवर प्रकाशन न होणे, प्रकाशन कालावधी बदलणे, प्रकाशन बंद पडणे, प्रकाशनाचे नाव व पत्ता बदलणे, नियतकालिकाच्या शीर्षकात बदल होणे अशा अनेक कारणामुळे या विभागाचे या संगणकीकरण करणे आवश्यक होऊ लागले आहे. प्रत्यक शैक्षिणक ग्रंथालयात नियतकालिक विभाग हा महत्वपूर्ण आहे.

संगणक वाचनीय स्वरुपात आज बरीच नियतकालिके आहेत. या याव्दारेच नियतकालिकाची निवड करता येते. निवड करण्यात आलेल्या नियतकालिकाची वर्गणी भरणे महत्वपूर्ण असतात.

निरनिराळ्या विषयांवरील नवीन प्रकाशित नियतकालिके, संशोधन पुस्तिका, वाचन यादी, संशोधन विषय निर्देश, सार प्रकाशित करणे ही सर्व नियतकालिक विभाग करत असतो.

"पुस्तकरूपी ज्ञानधारा फक्त शहरापुरतीच मर्यादित न ठेवता भारताच्या लोकशाहीचा कणा असलेल्या ग्रामीण भागातपण पोहोचली पाहिजे."

असे माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतीष्ठान स्थापना प्रसंगी म्हटले होते.

आधुनिक युगात विविध ग्रंथालय व्यवस्थापन सहाय्याने ग्रंथालयाचे संगणकीकरण झाले आहे. पारंपारिक वाचन साधनांनी निर्माण झालेल्या समस्या दूर करण्यास इलेक्ट्रॉनिक वाचन साहित्य पूरक आहे. ग्रंथ नियतकालिके, परीषदांची कार्यवृत्ते पारंपारिक स्वरूपात प्रकाशित न होता ती इलेक्ट्रॉनिक माध्यमाव्दारे प्रकाशित होत आहेत. ही वाचन साहित्य संगणक नेटवर्कव्दारे प्राप्त केली जातात. इतका बदल ग्रंथालय व्यवस्थापनामध्ये आता झाला आहे.

डिजिटल ग्रंथालयामुळे जागेची बचत होते. मनुष्यबळ कमी लागते. इंटरनेटवर विनामुल्य उपलब्ध असलेली ई-प्रकाशने संशोधन लेखामधील संपूर्ण मजकूर वापरकर्त्यांना वाचण्याची किंवा दुव्याव्दारे इतरत्र जोडण्याची परवानगी असते.

डिजिटल वाचन सामग्री उदा. नियतकालिकातील अभ्यास पूर्ण लेख, संशोधन, निष्कर्ष यांची विनामुल्य उपलब्धता संशोधकाव्दारे प्रकाशित केले जातात.

आजच्या आधुनिक युगामध्ये पारंपारिक ग्रंथालयाचे डिजिटल ग्रंथालयात रुपांतर करण्याची प्रक्रिया सुरु झाली असून ग्रंथालयातील ग्रंथ, दुर्मिळ वाचन साहित्याचे तसेच इतर छापील साहित्याचे डिजिटल स्वरूपांतर करण्याची प्रक्रिया सुरु झाली असून ग्रंथालयातीय ग्रंथ, दुर्मिळ वाचन साहित्याचे तसेच इतर छापील साहित्याचे डिजिटल स्वरूपात परिवर्तन करून त्याचे जतन व संरक्षण करणे आवश्यक ठरत आहे. डिजिटल ग्रंथालयामुळे माहिती तंत्रज्ञान एक प्रकारे क्रांती आहे. आजची ग्रंथालये ही ग्लोबल रिसोर्स सेंटर होत आहेत.

२. संशोधन विषयाच्या कार्यात्मक व्याख्या :

अभियांत्रिकी :

वैज्ञानिक, आर्थिक, सामाजिक व प्रत्यक्षातील ज्ञान मिळविण्याच्या व वापरण्याच्या कैशल्यांना, व्यवसायांना आणि शास्त्रांना अभियांत्रिकि असे म्हणतात.

महाविद्यालय :

महाविद्यालये सर्वसाधारण पणे पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध करतात. काही महाविद्यालयामध्ये स्नातक अभ्यासक्रमही असतो.

नियतकालिक :

एका ठराविक काळानंतर नियमितपणे प्रकाशित होणाऱ्या मुद्रित किंवा हस्तलिखित प्रकाशनाला नियतकालिके म्हणतात.

व्यवस्थापन :

प्रत्येक व्यक्तीस निश्चित स्वरूपाचे काम देणे. आपली उदिष्टे साध्य करण्यासाठी ते काम सक्षमपणे करणे या सर्व प्रक्रियेस व्यवस्थापन म्हणतात.

३. संशोधनाची उदिष्टे :

१. महराष्ट्रातील अभियांत्रिक महाविद्यालयातील माहिती घेणे.

२. सदरील महाविद्यालय ग्रंथालयातील नियतकालिकांची उपलब्धता जाणून घेणे.

३. सदरील महाविद्यालय ग्रंथालयातील उपलब्ध नियतकालिकांचे विषय निहाय वर्गीकरण करणे

४. सदरील महाविद्यालय ग्रंथालयातील निवड, उपार्जन, नोंदणी, मांडणे, सेवा व सूरिक्षतता या संदर्भात व्यवस्थापन जाणून घेणे.

५. सदरील महाविद्यालय ग्रंथालयातील नियतकालिक व्यवस्थापनाची परीणामकारकता तपासणे.

४. संशोधनाची ग्रहीतकृत्ये :

१. महराष्ट्रातील अभियांत्रिक महाविद्यालयातील माहिती घेणे.

२. सदरील महाविद्यालय ग्रंथालयातील नियतकालिकांची उपलब्धता जाणून घेता येते.

३. सदरील महाविद्यालय ग्रंथालयातील उपलब्ध नियतकालिकांचे विषय निहाय वर्गीकरण करता येते.

४. सदरील महाविद्यालय ग्रंथालयातील निवड, उपार्जन, नोंदणी, मांडणे, सेवा व सूरिक्षतता या संदर्भात व्यवस्थापन जाणून घेता येते.

५. सदरील महाविद्यालय ग्रंथालयातील नियतकालिक व्यवस्थापनाची परीणामकारकता तपासता येते.

५. संसोधनाची व्याप्ती व मर्यादा :

सदरील शोध प्रबंधाची व्याप्ती AICTE संलग्नित मराठवाड्यातील अभियांत्रिकी महाविद्यालय ग्रंथाल्यापुरती असून शैक्षिणक वर्ष २०१२-१३ ते २०२१-२०२२ या १० वर्षांच्या कालखंडापुरतीच मर्यादित असेल.

६. संदर्भ साहित्यचा आढावा :

संदर्भ साहित्याचा आढावा हा जुन्या साहित्याचा नव्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी महत्वपूर्ण असतो. त्यामुळे संशोधकला नवीन सद्यस्थितीतममध्ये नेमकेपणाने परिस्थितीचा अंदाज लक्षात येत असतो. अभ्यास विषयाकडे नव्या दृष्टीने पाहता येते. संसोधानासाठीचा घेतलेला नविन विषय प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या पूर्वी या आधी झालेल्या संशोधनाशी संबंधित असतो. त्यामुळे संशोधकाने निवडलेले विष्ज्ञय क्षेत्राशी संबंधित साहित्याचे वाचन, चिंतन करणे हा संशोधानातील महत्वाचा भाग असतो.

Management of periodicals in college libraries affiliated to Swami Ramanand Tcerth Marathvada University Nanded. A study

Somwanshi Trimurti Baburao

Use of periodical literature in medical college libraries affiliated to Dr. Babasaheb Anbedkar Marathwada university Aurangabad

Shinde Ramesh Raghunath

७. संशोधनाची उपयुक्तता आणि गरज :

महाराष्ट्रातील प्रत्येक अभीयांत्रिकी महाविद्यालयामधील नियतकालिकाचे व्यवस्थापन गरज हे प्रत्येक उपभोक्तांना संशोधक, वाचक यांना उपयुक्त ठरणार आहे. आणि विविध नियतकालिक व्यवस्थापन संदर्भात उपभोक्तांना माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

८. संशोधन पद्धती :

सदरील संशोधनसाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

९. माहिती साधने :

माहिती संकलन तंत्र :

सदरील संशोधनाच्या माहिती संकलनासाठी पाहाणी संकाळू तंत्र उपयोगात आणले जाणार आहे.

माहिती संकलन साधने :

सदरील संशोधनाच्या माहिती संकलनासाठी प्रश्नावली ही साधने वापरली कानाज आहेत.

१०. संशोधनाची रूपरेषा :

प्रस्तावना

संशोधन पद्धती संबंधित साहित्याचा आढावा

महाराष्ट्रातील अभियांत्रिकी महाविद्यालये

नियतकालिकाचे व्यवस्थापन

माहिती संकलन, विश्लेष्ज्ञण व निर्वचन

नियतकालिकांचे मूल्यमापन व मार्गदर्शन योजना

निष्कर्ष व शिफारशी

११. वर्षवार कामाची आखणी :

अ.क्र	संशोधन कार्याचा तपशील	कालावधी
१.	मुलभूत माहिती साधणे मिळवणे	६ महिने
२.	अभियांत्रिकी महाविद्यालयांना भेटी	६ महिने
३.	प्रश्नावलीचे प्रारूप तयार करणे	६ महिने
४.	माहिती संकलित आणि विश्लेषण करणे	६ महिने
५.	प्रत्यक्ष लिखान	६ महिने
६.	प्रबंध दाखल करणे	६ महिने

प्रकरणांचा आराखडा

१.प्रकरण पहिले : संशोधन प्रकल्प विषय प्रवेश

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दीष्टे

१.३ व्याप्ती आणि मर्यादा

१.४ प्राथमिक अनुमान

१.५ पूर्वसाहीत्याचा शोध

१.६ ग्रंथापालन व्यवसायातून महत्व

१.७ संशोधन पद्धती

१.८ माहिती संकलन तंत्र

१.९ माहिती संकलन साधने

१.१० पुढील प्रखारणाचा आराखडा

२. प्रकरण दुसरे : पूर्व अभ्यासाचे सामोलोचन

३. प्रकरण तिसरे : माहिती संकलन

३.१ महाराष्ट्रातील अभियांत्रिकी महाविद्यालय ग्रंथालयातील नियतकालिकांचा आढावा घेणे.

४. प्रकरण चौथे : माहिती विश्लेषण

४.१ महाराष्ट्रातील अभियांत्रिकी महाविद्यालय ग्रंथालयातील नियतकालिकांचे सांख्यिकिय विश्लेषण करणे.

५. प्रकरण पाचवे : समापन

५.१ निष्कर्ष व शिफारशी

५.२ शिफारशी

५.३ पुढारी संशोधनास दिशा

संदर्भ सूची

परीशिषटे

संदर्भ

१) Curtis Donnelyn – "E Journals a how to do manual for building managing and supporting electric journal collections" London facet publishing 2005

2) Kaliammal A and Thamaraiselvi G. "Role of ICTS in library and Lnformation Science" Delhi Author press, 2005. PP 169-182.

3) Nisanger Thomas E. "Management of serials in libraries" Englewood. Libraries unlimited live 2004 PP-207-300.

4) Parekh Harsha "lnternet in the scholarly communication process. "Mumbai- mukherjee knowledge were Association 1999 PP. 87-117.

5) Singh B.K. and Singh D.K. "Electronic journals its delivery use and access in information technology for libraries Kailas Narayan vyas, ed. Jaipur- Raj publishing House 2005 Pp. 79-89.

6) Thopa Neelam, et al :E-Publishing Beginning of a new era of a new era of e-journals" No.47(4) 2002 PP. 216-221.

7) NAAC Best practice service April 2006 Banglore modern library

management and best practices.

8) अष्टीकर आणि कप्तान – व्यवसाय व्यवस्थापनात आणि प्रकाशन प्रथम आवृती – १९९४, साहिल प्रकाशन, नागपूर

९) कांयदे पाटील डॉ. गंगाधर – व्यवस्थापनाची मूलतत्वे, चैतन्य पब्लीकेशन, नाशिक.

१०) फडके द.ना. – ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, पुणे युनिव्हर्सल प्रकाशन २००७.

११) पवार एस. पी. ग्रंथालय व माहितीशास्त्र पुणे, फडके प्रकाशन.

१२) कोन्नुर सुजाता, कोन्नुर अनुप मेखल (२००९) माहिती तंत्रज्ञान, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स.

१३) फडके द.ना. (२००७) – ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण पुणे युनिव्हर्सल प्रकाशन.

१४) हेडावू मुरलीधर (२०१३) डिजिटल ग्रंथालय : आधुनिक काळजी गरज UGC Sponsored National Conference on emerging Trade in Academic Library Late Karmveer Dr. PR Ghogery science college. Dhule.

15) Deegan, marlyan and simmon, Tann

संशोधन
अडसुळे पल्लवी पांडुरंग

मार्गदर्शन
डॉ. ढाकणे बालाजी निवृत्ती